ePaper

**राज्यभरात उन्हाचा चटका; मालेगावात पारा 40 अंश सेल्सिअसवर!**

| वर्ष - 7 । अंक - 296 | UDYAM-MH-26-0158827 |




# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत


- रणजी विजयाकडे मुंबईची वाटचाल
- आम्ही सलमानसारखे यशस्वी
- हरियाणामध्ये राजकीय भूकंप
- 6 पैकी 5 जागा भाजपच्या पारड्यात


www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 13 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## लोकसभा निवडणूक : मावळात संजोग वाघेरेंची वाढली ताकद

# पिंपरी गावकी-भावकीची ‘वज्रमूठ’!

## » समन्वय बैठकीला सर्वपक्षीय पदाधिकारी, नेत्यांची हजेरी

। पिंपरी । महाईन्यूज

**संयमी व संवेदनशील राजकारणी म्हणून पिंपरी चिंचवड शहराला परिचित असलेले माजी महापौर संजोग वाघेरे पाटील यांना खासदार करण्याचा एकमुखी नारा पिंपरीगावातील ग्रामस्थांनी दिला. त्यांच्या निमित्ताने मावळ लोकसभा मतदारसंघातून संसदेत प्रतिनिधीत्व करण्याची संधी सर्व मिळून खेचून आणू, असा निर्धार यावेळी गावातील प्रमुख पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक आणि युवा कार्यकर्त्यांनी केला.**




पिंपरी चिंचवड शहरातील ज्येष्ठ नेते तथा माजी महापौर संजोग वाघेरे पाटील यांना मावळ लोकसभा मतदारसंघातून शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यांच्या पाठिशी भक्कमपणे उभे राहण्याचा संदेश पिंपरीगाव येथील ग्रामस्थांना दिला आहे. पिंपरी येथील गणेश हॉटेल येथे नुकतीच पिंपरीगावातील सर्व ग्रामस्थ, नातेवाईक, हितचिंतक यांनी स्वयंस्फूर्तीने समन्वय बैठक घेतली. या बैठकीला पिंपरीगावचे माजी नगरसेवक, विविध पक्ष-संघटनांचे आजी-माजी पदाधिकारी, सिंधी समाजातील प्रमुख पदाधिकारी, व्यापारी बांधव, ज्येष्ठ नागरिक, तरुण मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संजोग वाघेरे पाटील यांनी कायम पिंपरीगावच्या, तसेच पिंपरी चिंचवड शहराच्या विकासासाठी योगदान दिले आहे. त्यांच्या राजकीय वाटचालीत त्यांना यापूर्वी मोठी संधी मिळणे गरजेचे होते. परंतु, आता मावळ लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून ही संधी संजोग वाघेरे पाटील यांच्यासाठी व पिंपरीगावसाठी आलेली आहे. त्यांच्या निमित्ताने आपल्या हक्काचा माणूस खासदार होणार आहे. देशाच्या संसदेत प्रतिनिधीत्व करण्याची संधी एकप्रकारे पिंपरीगावाला मिळणार आहे. ते आजवर प्रत्येकांच्या अडीअडचणीत निस्वार्थ वृत्तीने आपल्या पाठीशी उभे राहिले आहेत. या निवडणुकीत सर्व मिळून त्यांच्या पाठिशी उभा राहू आणि हा मावळ लोकसभेवर विजयाची पताका फडकवू, असे मत उपस्थित ज्येष्ठ पदाधिकारी व ग्रामस्थांनी मांडले.

> “ मावळ लोकसभा मतदारसंघात शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून संघटकपदाची जबाबदारी मिळाली. तेव्हापासून पिंपरीगावातील सर्व ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग आणि तरुण मंडळाचे कार्यकर्ते ठामपणे भक्कम पाठिशी उभे राहिले आहेत. त्यांनी बैठकीतून माझ्यावर विश्वास टाकला आहे. माझ्या ग्रामस्थांनी, हितचिंतकांनी टाकलेला हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आपण कटीबध्द आहोत.
>
> **– संजोग वाघेरे पाटील,**
> मावळ लोकसभा संघटक, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)

## महापालिका आयुक्तांचा केवळ ‘हवेत गोळीबार’!

## » दत्तमंदिर रोड समस्या ‘जैसे थे’ : परिसरातील सोसायटीधारकांत नाराजी

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाकड दत्त मंदिर रास्ता रुंदीकरण विषयावर १७ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या बैठकीत दिलेली आश्वासने दोन महिन्यांनंतरही पाळली नाहीत. केवळ रस्ता रुंदीकरणासाठी आम्ही आग्रही आहोत, अशी जुमलेबाजी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून केली जात आहे. त्यामुळे परिसरातील सोसायटीधारकांमध्ये प्रचंड नाराजी आहे.**



वाकड दत्तमंदिर रोड रुंदीकरणाचे काम सुरू आहे. मात्र, रस्त्यावरील अतिक्रमणामुळे रस्ता अरुंद आणि रुंदीकरण नावालाच सुरू आहे, अशी स्थिती आहे. याबाबत स्थानिक सोसायटीधारकांनी महापालिका प्रशासनाला लेखी निवेदन दिले आहे. असे असतानाही त्यावर कार्यवाही होत नाही. याबाबत जाब विचारण्यासाठी गृहनिर्माण संस्थेच्या रहिवासीयांनी आयुखतांच्या महापालिकेच्या कार्यालयात भेट घेतली. या बैठकीला या रस्त्यावरील अंदाजे १७- १९ गृहनिर्माण संस्थंमधील रहिवासी उपस्थित होते.

### आढावा बैठक फिस्कटली...

» वाकड रहिवासीयांच्या या काम सुरु असलेल्या रस्त्यावर बांधण्यात येणाऱ्या प्रस्तावित पदपथांची रुंदी अरुंद करण्याच्या मागणी केली. तसेच मग या विषयावरील आयुक्तांच्या उत्तरावरून बैठकीत लोकांमध्ये बराच मोठा गोंधळ आणि संभ्रम निर्माण झाला. रुंद पदपथ आणि त्यांना रुंद ठेवण्याच्या पालिकेचे उदिष्ट आयुक्तांनी स्पष्ट केले. उपस्थित रहिवासीयांनी पदपथावरील हातगाड्या व विक्रेते यांवर कारवाई करण्याची आग्रही मागणी लोकांनी लावून धरली.

# आमदार बच्चू कडू यांची सरकारवर नाराजी

## दिव्यांग कल्याणासाठी अर्थसंकल्पात कमी तरतूद

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष, आमदार बच्चू कडू यांनी दिव्यांग कल्याणासाठी अर्थसंकल्पात कमी तरतूद असल्याबाबत नाराजी व्यक्त केली. राज्याच्या सहा लाख कोटी रुपयांच्या १४०० कोटी रुपयांची तरतूद दिव्यांग कल्याणासाठी असून, प्रत्येक विभागाकडून पाच टक्के निधी दिव्यांग कल्याणासाठी वापरण्याची तरतूद लक्षात घेता सुमारे ३० हजार कोटी रुपये दिव्यांग कल्याणासाठी मिळायला हवेत, अशी भूमिका कडू यांनी मांडली.**



दिव्यांग कल्याण विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क, बालकल्याण संस्था यांच्यातर्फे विद्यापीठातील ज्ञानेश्वर सभागृहात विशेष राज्यस्तरीय कार्यशाळेत कडू बोलत होते. बालकल्याण संस्थेचे अध्यक्ष प्रतापराव पवार, लेफ्टनंट जनरल (निवृत्त) राजेंद्र निंभोरकर, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र कुलगुरु पराग काळकर, कुलसचिव विजय खरे, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज आणि अॅग्रीकल्चरचे अध्यक्ष दीपक करंदीकर, सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र जगदाळे, दिव्यांग कल्याण विभाग आयुक्तालयाचे उपायुक्त संजय कदम, समाजकल्याण विभागाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. दिनेश डोके या वेळी उपस्थित होते. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दृक् श्राव्य पद्धतीने कार्यशाळेत मार्गदर्शन केले.कडू म्हणाले, की राज्यात दिव्यांगांच्या शिक्षणाची जबाबदारी शिक्षण विभागाकडे दिली पाहिजे. त्याच्या अंमलबजावणीसाठी विभागाला स्वतंत्र संचालक असायला हवा. संचालकपदी शक्यतो सैन्य दलातील माजी अधिकारी असावा. विविध क्षेत्रांत उच्च तंत्रज्ञानासंबंधी संशोधन सुरू असले, तरी जन्मत: शारीरिक अपंगत्व टाळू शकणाऱ्या संशोधनाकडे फारसे लक्ष दिले जात नाही. अपंगत्व न येण्यासाठीच्या मोहिमा राबवणे, अपंगत्व कमी करणे, अपंगांचे पुनर्वसन, उपकरणे देणे यावर सरकारचा भर असायला हवा.राज्यातील सुमारे तीन टक्के लोकसंख्या दिव्यांग आहे. त्यांच्यासाठी अनेक योजना राबवल्या जातात. दिव्यांग कल्याणासाठी स्वतंत्र विभाग असलेले महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. सामाजिक न्याय विभाग सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क यांच्याशी सामंजस्य करार करणार आहे. पुढील दोन वर्षात तंत्रज्ञानावर आधारित दिव्यांग व्यक्ती चालवतील अशा शंभर कंपन्या उभारून प्रत्येक कंपनीत १०० दिव्यांग व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दिव्यांग कल्याणासाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारण्यात येईल.

### दिव्यांगांच्या शिक्षणाची जबाबदारी

» त्यासाठीचा निधी दिव्यांग कल्याण विभागाकडून दिला जाणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. दिव्यांग कल्याण विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क, बालकल्याण संस्था यांच्यातर्फे विद्यापीठातील ज्ञानेश्वर सभागृहात विशेष राज्यस्तरीय कार्यशाळेत कडू बोलत होते. बालकल्याण संस्थेचे अध्यक्ष प्रतापराव पवार, लेफ्टनंट जनरल (निवृत्त) राजेंद्र निंभोरकर, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र कुलगुरु पराग काळकर, कुलसचिव विजय खरे, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज आणि अॅग्रीकल्चरचे अध्यक्ष दीपक करंदीकर, सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र जगदाळे, दिव्यांग कल्याण विभाग आयुक्तालयाचे उपायुक्त संजय कदम, समाजकल्याण विभागाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. दिनेश डोके या वेळी उपस्थित होते. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दृक् श्राव्य पद्धतीने कार्यशाळेत मार्गदर्शन केले.कडू म्हणाले, की राज्यात दिव्यांगांच्या शिक्षणाची जबाबदारी शिक्षण विभागाकडे दिली पाहिजे. संचालकपदी शक्यतो सैन्य दलातील माजी अधिकारी असावा. विविध क्षेत्रांत उच्च तंत्रज्ञानासंबंधी संशोधन सुरू असले.

# साखर कारखान्यांच्या सहवीज प्रकल्पांना 'ऊर्जा!

## प्रति युनिट दीड रुपये अनुदान देण्याचा राज्य सरकारचा निर्णय

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**साखर कारखान्यांच्या सहवीज प्रकल्पांनी महावितरणला दिलेल्या विजेला वर्षभर प्रति युनिट दीड रुपया अनुदान देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे साखर कारखान्यांना दिलासा मिळाला, बंद आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापलेल्या सहवीज प्रकल्पांना 'ऊर्जा मिळणार आहे.**

नुकताच काढण्यात आला आहे. राज्यातील ६२ सहकारी आणि ६० खासगी साखर कारखान्यांनी बगॅसवर आधारित सहवीज प्रकल्प उभारले आहेत. या सहवीज प्रकल्पात निर्मिती करण्यात आलेल्या विजेला महाराष्ट्र विद्युत आयोगाने प्रति युनिट ४.७५ ते ४.९९ रुपये इतका निश्चित केला आहे. हा दर उत्पादन खर्चापेक्षा कमी असल्यामुळे सहवीज प्रकल्प अडचणीत आले होते. त्यामुळे वीज खरेदी दरात वाढ करण्याची मागणी सातत्याने होत होती. राज्य सरकारच्या २०२०च्या ऊर्जा धोरणानुसार अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पाद्वारे २०२५ पर्यंत १३५० मेगावॉट वीज निर्मितीचे लक्ष्य होते. पण, अपारंपरिक विजेला किफायतशीर दर मिळत नसल्यामुळे क्षमता असूनही अपारंपरिक वीज निर्मितीचे ध्येय गाठता येत नव्हते. शिवाय बगॅसचे दर वाढल्यामुळे उत्पादन खर्चही वाढला होता. त्यामुळे अनुदान देण्याची निकड निर्माण झाली होती.राज्य सरकारकडून मिळणारे अनुदान प्रति युनिट सहा रुपयांच्या मर्यादित आणि एक वर्षासाठी मिळणार आहे. प्रति युनिट ६ रुपयांपेक्षा जास्त दर असलेल्या सहवीज निर्मिती प्रकल्पांना हे अनुदान मिळणार नाही. राज्य सरकारने १४ ऑक्टोबर २००८ ला ऊर्जा निर्मिती धोरण जाहीर करून बगॅसवर आधारित वीज निर्मिती प्रकल्पासाठी प्रति युनिट दर ७.५० रुपये दर दिला होता. त्यानंतर तो कमी करून प्रथम ६.५० रुपये प्रति युनिट आणि त्यानंतर ४.३५ रुपयापर्यंत खाली आणला आहे. आता साखर कारखान्यांना प्रति युनिट जास्तीत-जास्त सहा रुपये प्रती युनिट दर मिळणार आहे. सहा रुपयांपेक्षा कमी दर मिळणाऱ्या प्रकल्पांना जास्तीत-जास्त दीड रुपयांचे अनुदान मिळणार आहे. राज्यातील ६२ सहकारी आणि ६० खासगी साखर कारखान्यांनी बगॅसवर आधारित सहवीज प्रकल्प उभारले आहेत. त्यातून २०२२-२३मध्ये एकूण सुमारे ८३८ कोटी युनिट वीज निर्मिती झाली आहे. त्यापैकी कारखान्यांनी ३३९ कोटी युनिट स्वतःसाठी वापरले, तर ४७२ कोटी युनिटची महावितरण कंपनीस विक्री केली होती. वीज विक्रीतून कारखान्यांना २९४८ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळालेले होते.साखर कारखान्यांच्या सहवीज प्रकल्पांनी महावितरणला दिलेल्या विजेला पुढील वर्षभर प्रति युनिट दीड रुपया अनुदान देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे साखर कारखान्यांना दिलासा मिळाला असून, बंद आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापलेल्या सहवीज प्रकल्पांना 'ऊर्जा मिळणार आहे.



### 7.50 रुपये प्रति युनिट दर

» बगॅसच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे सहवीज प्रकल्पांतून निर्मितीचा खर्च वाढला आहे. उत्पादन खर्चापेक्षाही कमी दर मिळत असल्यामुळे सहवीज प्रकल्प आर्थिक अडचणीत आले आहेत. महावितरणकडून मिळत असलेला ४.३५ रुपये अधिक दीड रुपयांचे अनुदान, असा प्रति युनिट ५.८५ रुपये दर मिळेल, तोही एक वर्षासाठीच असणार आहे. २००८ मध्ये जाहीर केल्याप्रमाणे ७.५० रुपये प्रति युनिट दर मिळणे गरजेचे आहे, असे मत वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोशिएशनचे (विस्मा) अध्यक्ष – बी. बी. ठोंबर यांनी व्यक्त केले.

## बायोडायव्हर्सिटी पार्कला महापालिका आयुक्तांची गती

# तळवडेसुद्धा आता विकासाच्या स्पर्धेत अग्रेसर!

### भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तळवडे येथील नियोजित जागेत बायोडायव्हर्सिटी पार्क (जैवविविधता उद्यान) विकसित करण्यासाठी महापालिका आयुक्त तथा शेखर सिंह यांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, निविदा प्रक्रिया राबवण्याची कार्यवाही होणार आहे. त्यामुळे समाविष्ट गाव आणि रेडझोनमुळे प्रभावित झालेले तळवडेसुद्धा विकासाच्या स्पर्धेमध्ये अग्रेसर होणार आहे.**



समाविष्ट गावांच्या विकासाचा संकल्प आमदार महेश लांडगे यांनी ‘व्हीजन- २०२०’ अंतर्गत सोडला होता. चिखली, मोशी, चऱ्होली, डुडूळगाव, दिघी, बोऱ्हाडेवाडी आदी भागात २०१७ पासून विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागले. तसेच, विविध विकासकामांचे नियोजन करण्यात आले. मात्र, तळवडे भागात रेडझोनच्या प्रभावामुळे विकासकामे आणि पायाभूत सोयी-सुविधा देण्यात अडचणी येत होत्या. मात्र, अन्य समाविष्ट गावांच्या सोबतच तळवडेचाही विकास त्याच गतीने झाला पाहिजे, असा आग्रह आमदार लांडगे यांनी धरला होता.

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढते तापमान तसेच प्रदुषण रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने तळवडे येथे जैवविविधता उद्यान उभारण्याची आवश्यकता आहे. शहरीकरण व नागरिकीकरणामुळे सरासरी तापमानात आणि प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होत आहे.

त्यामुळे शहरातील नैसर्गिक स्त्रोतांच्या संवर्धनासाठी तसेच नागरिकांना जैवविविधता उद्यानाचे महत्व पटवून देण्यासाठी त्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी महापालिकेच्या वतीने तळवडे जैवविविधता उद्यान विकसित करण्यात येणार आहे. त्यामुळे सुमारे १०० कोटी रुपयांचा खर्च राज्य व केंद्र सरकार आणि महापालिका प्रशासन असा संयुक्तपणे करणार आहे.

तळवडे येथील रेड झोन हद्दीतील गायरान जागेत बायोडायव्हर्सिटी पार्क (जैवविविधता उद्यान) विकसित करण्याबाबत प्रशासनाने पुढाकार घ्यावा. त्यासाठी सल्लागार नियुक्ती करावी आणि निविदा प्रक्रिया राबवण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी आमदार लांडगे यांनी लावून धरली होती. निगडी, चिखली, तळवडे, मोशी आणि परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. त्यामुळे तळवडेतील जैवविविधता उद्यान विकासासाठी मैलाचा दगड ठरणार आहे.

जैवविविधता उद्यानामध्ये वेगवेगळी वनस्पती, दुर्मिळ औषधी झाडे व वेली, देशी जातीचे झाडे, फळ व फुल झाडे अश्या संकल्पनेवर विशिष्ट थीमवर झाडांची लागवड करून संवर्धन करावे. पर्यटकांना फिरण्यासाठी ट्रॅक, खाद्यपदार्थाचे स्टॉल, मनोरंजनाची साधणे, असा अत्याधुनिक सोयी-सुविधा असलेला देशातील सर्वात मोठा हे बायोडायव्हर्सिटी पार्क उभारल्यास पर्यटन विकासाला चालना मिळणार आहे.

### हे व्रत असेच निरंतर सुरु रहावे

**»जैवविविधता उद्यान शहराचा ‘ऑक्सिजन पार्क’ ठरेल : आमदार लांडगे आमदार लांडगे म्हणाले की, जागतिक बँकेच्या २०१८ सालच्या एका अहवालानुसार, भारतात एकूण लोकसंख्येच्या ३६ टक्के लोक वेगवेगळ्या कारणांसाठी शहरात वस्ती करतात. त्यामुळे शहरांची रचना करताना, नागरिकांना आरोग्यविषयक आणि इतर मूलभूत सोयी पुरवताना निसर्गाचे रक्षण आणि संवर्धन यांकडेही लक्ष दिले पाहिजे. विनामूल्य शुद्ध हवा आणि आल्हाददायी गारवा या आरोग्यदायक सेवांमुळे अशी उद्याने म्हणजे शहराची फुप्फुसेच अर्थात ‘ऑक्सिजन पार्क’ ठरणार आहेत, अशी आमची भूमिका आहे.**

“ समाविष्ट गावांचा विकास हा आमचा प्रमुख अजेंडा राहिला आहे. भोसरी विधानसभा मतदार संघातील सर्वच समाविष्ट गावांमध्ये २० वर्षापासून रखडलेला विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला आहे. मात्र, रेड झोनच्या प्रभावामुळे तळवडेतील प्रकल्प आणि पायाभूत सोयी-सुविधा विकासाचा तांत्रिक अडचणी येत होत्या. राज्य व केंद्र सरकारच्या मदतीने आता महापालिका प्रशासन तळवडेत बायोडायव्हर्सिटी पार्क विकसित करणार आहे. त्यामुळे विकासाच्या स्पर्धेत तळवडेसुद्धा आघाडीवर राहील, असा विश्वास वाटतो.

**-महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसतर्फे पदवीधरांसाठी रोजगार मेळावा

### » तरुणांना स्वयंसिद्ध होण्याची सुवर्णसंधी : दि. 16 मार्च रोजी आकुर्डी येथे शिबीर

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील तरुणांना स्वयंसिद्ध होण्यासाठी भव्य रोजगार मेळावा व मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात जास्तीत जास्त युवकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केले आहे.**



पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष शेखर काटे आणि पदाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने केवळ पदवीधर तरुणांसाठी रोजगार मेळावा व मार्गदर्शन शिबीर आयोजित केले आहे. त्याची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत अजित गव्हाणे बोलत होते.

आकुर्डी प्राधिकरण येथील प्रा. रामकृष्ण मोरे आर्ट्स अँन्ड सायन्स कॉलेजमध्ये शनिवार, दि. १६ मार्च २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत शिबीर होणार आहे. अधिक माहितीसाठी 8235909090 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

सदर पत्रकार परिषदेस शहराध्यक्ष अजित गव्हाणे महिला अध्यक्ष कविता आल्हाट, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर, मा. विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, युवक अध्यक्ष शेखर काटे, युवक प्रदेश उपाध्यक्ष विशाल वाकडकर, पुणे इन्स्टिट्यूट डायरेक्टर चेतन गवळी, माजी नगरसेवक भोसरी विधानसभा अध्यक्ष पंकज भालेकर, महिला वरिष्ठ कार्याध्यक्ष कविता खराडे, युवक कार्याध्यक्ष तुषार ताम्हाणे, प्रसाद कोलते, पिंपरी विधानसभा युवक अध्यक्ष अक्षय माछरे, भोसरी विधानसभा युवक अध्यक्ष सागर बोराटे, प्रशांत सपकाळ, चिंचवड विधानसभा अध्यक्ष प्रतीक साळुंखे, गणेश गायकवाड, संकेत जगताप, भागवत जवळकर, ओंकार विनोदे, आधी पदाधिकारी उपस्थित होते.

### संधीचे सोने करूया... रोजगाराची कास धरूया : शेखर काटे

**»शेखर काटे म्हणाले की, राज्याचे नेते तथा उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच युवा नेते पार्थ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवक राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष सूरज चव्हाण यांच्या संकल्पनेतून उद्योगनगरीतील तरुणांना स्वयंसिद्ध होण्याची संधी या शिबिराच्या माध्यमातून आम्ही निर्माण केली आहे. नामांकित ६० कंपन्यांचे स्टॉल एकाच छताखाली लावण्यात येतील. त्यातून फार्मा एफएमसीजी, बँकींग, आयटी, रिअल इस्टेट, इन्शुरन्स, ॲग्रीटेक, हेल्थकेअर अशा विविध क्षेत्रातील कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे तरुणांनी संधीचे सोने करावे आणि रोजगाराची कास धरावी, असे आवाहन करीत आहेत.**

# तूर्तास लाभ चॉकलेट स्वस्ताई पुरता!



भूमिका

**तब्बल १६ वर्षांच्या प्रदीर्घ वाटाघाटींनंतर भारत आणि चार युरोपीय देशांची 'युरोपियन फ्री टेड असोसिएशन' (ईएफटीए) ही संघटना यांच्या दरम्यान मुक्त करारावर शिक्कामोर्तब झाले. ईएफटीएमध्ये स्वित्झर्लंड, नॉर्वे, आइसलँड आणि लिक्टनस्टाइन या चार देशांचा समावेश होतो.**

एखाद्या युरोपीय राष्ट्रसमूहाशी मुक्त व्यापार करारावर यशस्वी शिक्कामोर्तब होण्याची भारताची ही पहिलीच वेळ. अर्थात आकार लक्षात घेता, ब्रिटन आणि युरोपीय समुदाय (ईयू) या युरोपातील खऱ्या अर्थाने बड्या अर्थव्यवस्था आहेत. यांपैकी ब्रिटनशी मुक्त व्यापार चर्चा गेले अनेक महिने सुरू आहे. युरोपीय समुदाय किंवा ईयूबरोबर आपण तशी चर्चाच अद्याप सुरू केलेली नाही. यापूर्वी मॉरिशस, ऑस्ट्रेलिया आणि संयुक्त अरब अमिराती या तीन देशांशी भारताचे मुक्त व्यापार करार झालेले आहेत. प्रस्तुत कराराचे नाणे अधिक जोमदारपणे वाजवले जात आहे, कारण त्याविषयी वाटाघाटी 'त्या' सरकारच्या पहिल्या कार्यकाळात (२००८) सुरू झाल्या आणि 'त्या'च सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात (२०१३) गुंडाळाव्या लागल्या. या वाटाघाटींचे पुनरुज्जीवन 'या' सरकारच्या पहिल्या कार्यकाळात (२०१६) झाले आणि 'या'च सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात (२०२४) त्या सुफळ संपूर्ण होत आहेत. शिवाय हल्ली सरकारी पातळीवर सारे काही आगामी वायद्याच्या भाषेत, म्हणजे पुढील



१५ वर्षे, २५ वर्षे असेच बोलले जाते. तेव्हा कोणीतरी विद्यमान स्थितीवरही बोलण्याची गरज उरतेच. या करारानुसार येत्या १५ वर्षांमध्ये १०० अब्ज डॉलर किंवा अंदाजे ८,२७५ कोटी रुपयांची गुंतवणूक भारतात होणे अपेक्षित आहे. या गुंतवणुकीमुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे. कराराची उद्दिष्टे अनेक होती. भारतातील औषधनिर्मिती, कापड, रसायने आणि यांत्रिकी अशा क्षेत्रांना चार देशांची बाजारपेठ उपलब्ध होईल. त्याच्या बरोबरीने वाहन उद्योग, अन्नप्रक्रिया, रेल्वे, वित्तीय क्षेत्र यांमध्ये ईएफटीएकडून भारतात गुंतवणूक अपेक्षित आहे. युरोपातील कोणत्याही देशाला किंवा राष्ट्रसमूहाला सध्या बाजारपेठेची नितांत गरज आहे. करोना आणि युक्रेन या संकटांची झळ जगातील बहुतेक अर्थव्यवस्थांना बसली, त्यांत ईएफटीएचाही समावेश आहे. दुसरीकडे, जागतिक पुरवठा शृंखलेत चीनवरील अवलंबित्व कमी करणे हे भारताचे एक उद्दिष्ट आहे. ही झाली या कराराची पार्श्वभूमी. बारकाव्यांमध्ये शिरल्यास दोन प्रमुख अडथळे दिसतात, त्यांचा परामर्श घेतला पाहिजे.मुक्त व्यापाराचा फायदा दोन्ही पक्षांना (संबंधित राष्ट्रे किंवा राष्ट्रसमूहांना) सामायिक होणे अपेक्षित आहे. पण भारताची ईएफटीएमधील देश, विशेषत: स्वित्झर्लंडशी व्यापारी तूट मोठी आहे. या देशातून भारतात गतवर्षी १५.७९ अब्ज डॉलर मूल्याची आयात झाली. तर भारतातून त्या देशात झालेल्या निर्यातीचे मूल्य १.३४ अब्ज डॉलर होते. याचा अर्थ १४.४५ अब्ज डॉलरची व्यापारी तूट. इतका असमतोल व्यापार असलेल्या देशाला आपल्या देशाची बाजारपेठ कमीत कमी शुल्क आकारून आंदण देणे कितपत शहाणपणाचे ठरेल, हा पहिला मुद्दा. दुसरा मुद्दा पुन्हा स्वित्झर्लंडविषयीच. या देशाने १ जानेवारी २०२४ रोजी सर्व प्रकारच्या औद्योगिक वस्तूंच्या आयातीवरील शुल्क शून्यावर आणले आहे. या निर्णयामुळे स्विस बाजारपेठेमध्ये भारतीय मालाला इतर देशांकडूनही कडवी स्पर्धा निर्माण होईल. मुक्त व्यापार धोरणाअंतर्गत दोन देशांना परस्परांच्या बाजारपेठेत काही विशेष सवलती (उदा. शुल्कसवलत किंवा शुल्कमाफी) बहाल होतात. येथे तर स्वित्झर्लंडशी मुक्त व्यापार न केलेल्या देशांनाही ती बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. मग भारतीय मालाला विशेष वागणूक ती काय मिळणार?

भारतीय अर्थव्यवस्था ही मोठी आणि विस्तारणारी असली, तरी भारताची निर्यात कृषीमाल आणि छोट्या औद्योगिक वस्तूंच्या क्षेत्रात, तसेच कुशल-अकुशल कामगार आणि सेवा क्षेत्रात आहे. ही स्थिती जोवर बदलत नाही, तोवर अशा प्रकारच्या मुक्त व्यापार धोरणांचा फायदा भारताला होणार नाही. ईएफटीएकडून भारताने व्यापारासमवेत गुंतवणुकीची हमी घेतली आहे. परंतु त्याचे फायदे तात्कालिक नसतात, दीर्घकालानंतर दिसू लागतात. ते कुणी पाहिले? तेव्हा सध्या तरी या करारामुळे भारतात स्विस चॉकलेट थोड्या स्वस्तात मिळू लागतील, इतकेच त्याचे कवित्व!

## संपादकीय »

### बँक ते स्विस बँक!

***निवडणूक रोखे हा ज्या सरकार आणि राजकीय पक्षांचा प्रश्न आहे, त्यांच्या अब्रूरक्षणार्थ स्वायत्त संस्थांनी स्वत:ची पुण्याई पणास का लावावी?***

इंग्रजीतील 'टू क्लेव्हर बाय हाफ' या वाक्प्रचाराचा उपयोग वाक्यात कसा करावयाचा हे विद्यार्थ्यांस शिकवावयाचे असेल तर या भारतवर्षातील समस्त शालेय शिक्षकांनी स्टेट बँकेचे सोमवारी सर्वोच्च न्यायालयात जे काही झाले त्याचा दाखला अगत्याने द्यावा. मराठी माध्यमांतील शिक्षकांस त्यासाठी 'हात दाखवून अवलक्षण' या वाक्प्रचाराचा पर्याय आहे. सर्वोच्च न्यायालयाने १५ फेब्रुवारीच्या महत्त्वपूर्ण निकालाद्वारे निवडणूक रोख्यांची अपारदर्शकता संपुष्टात आणली आणि या देणगीदारांचा सर्व तपशील सर्वांस खुला करण्याचा आदेश निवडणूक आयुक्त आणि स्टेट बँकेस दिला. त्याचे सर्व पारदर्शी लोकशाहीप्रेमींप्रमाणे 'लोकसत्ता'नेही संपादकीय स्वागत केले ('झाले मोकळे आकाश'- १६ फेब्रुवारी). विद्यमान सरकारने निवडणुकीतील पारदर्शकतेच्या नावाखाली ही रोखे पद्धत आणली तेव्हापासून 'लोकसत्ता'ने यात पारदर्शकतेचा अभाव कसा आहे.

नागरिकत्व दुरुस्तीची व्याप्ती काय? दुरुस्त केलेल्या कलमांचा नवा अर्थ काय? जी दुरुस्ती केली गेली ती आपली गरज भागवते का? ती गरज भागवण्यासाठी ही दुरुस्ती करणे हा एकमेव पर्याय आहे का? तसे नसेल तर इतर पर्यायांच्या तुलनेत ही दुरुस्ती उजवी आहे का?

# 'सीएए' : गरज काय? गहजब का?

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीआधी नागरिकत्व (दुरुस्ती) कायदा २०१९ (इंग्रजी आद्याक्षरांनुसार 'सीएए')ची अंमलबजावणी केली जाईल असे अलीकडेच काही जाहीर कार्यक्रमांतून घोषित केले होते, तशी अधिसूचना सोमवारी, ११ मार्च रोजी निघाली. चार वर्षे विस्मृतीत गेलेले प्रकरण या घोषणेमुळे अचानक ताजे झाले. भारत सरकारने २०१९ मध्ये 'सीएए'द्वारे भारताच्या नागरिकत्व कायद्यात काही बदल केले होते. ते विधेयक संमत होताना आणि झाल्यावर देशभर विरोध झाला. त्या कोलाहलात अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले. या दुरुस्तीची नक्की गरज का पडते आहे? दुरुस्तीची व्याप्ती काय? दुरुस्त केलेल्या कलमांचा नवा अर्थ काय? जी दुरुस्ती केली ती आपली गरज भागवते का? ही दुरुस्ती हा एकमेव पर्याय आहे का? तसे नसेल तर इतर पर्यायांच्या तुलनेत ती उजवी आहे का? चर्चा भरपूर होत असूनही या प्रश्नांची उत्तरे मिळत नव्हती. शेवटचा




उपाय म्हणून उत्तरे शोधत आपलीच वाट चाचपडत जावे लागले. कोणत्याही व्यक्तीला ती राहत असलेल्या समाजात, प्रदेशात वा देशात अन्याय, अत्याचार, किंवा गांजणूक (पर्सिक्यूशन) सोसावी लागू शकते. अपवाद वगळता कोणत्याही बाबतीत अल्पसंख्याक असणाऱ्यांचा बहुसंख्याक समूहाकडून किंवा कृश गटांचा बलाढ्य गटांकडून छळ केला जातो. कोणीही गांजणूकग्रस्त झाल्यावर काही बाबतीत, आपण राहतो तो देश सोडून दुसऱ्या देशाकडे आश्रय मागणे एवढाच मार्ग उरतो. अशा परिस्थितीत ज्या देशात आश्रय घेत आहोत त्या देशात प्रवेश करण्यासाठी लागणारा परवाना स्थलांतरितांकडे असेलच असे नाही. अशा प्रकारच्या आश्रित पण परिस्थितीजन्य बेकायदा स्थलांतरितांविषयी भारतात सर्वंकष धोरण वा कायदा अस्तित्वात नाही. त्यामुळे तात्कालिक परिस्थितीत उभ्या राहणाऱ्या प्रश्नांवर तत्कालीन सरकारे कायदा बनवतात. तिबेटवर चीनने आक्रमण केले तेव्हा अनेक तिबेटी लोकांनी भारतात स्थलांतर केले. तत्कालीन भारत सरकारने त्यांच्यासंबंधी काही धोरणे आखली आणि कायदे केले. तार्किकदृष्ट्या जो प्रश्न आपले शेजारी असलेल्या मुस्लीमबहुल देशांमधून किंवा श्रीलंकेतून होणाऱ्या आश्रयान्वेषी स्थलांतरामुळे निर्माण होतो तो तिबेटींच्या स्थलांतरापेक्षा काही वेगळा नाही. अशा वेळी धोरणनिश्चितीसाठी तत्काळ नवे कायदे किंवा कायदेदुरुस्ती केली जाऊ शकते. अशाच प्रेरणेतून 'सीएए' ही दुरुस्ती केली गेली आहे असे प्रथमदर्शनी वाटते.अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तान या मुस्लीमबहुल देशांमध्ये अन्य धर्मीयांना अत्याचार सोसावे लागले आहेत. 'सीएए' हे फक्त या तीन देशांतून स्थलांतर केलेल्यांना लागू होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 6 पैकी 5 जागा भाजपच्या पारड्यात!

## शिवसेनेसाठी 13 जागा देण्यास सकारात्मक प्रतिसाद दिला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात आगामी लोकसभा निवडणुकांसाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. यंदाची निवडणूक चुरशीची ठरणार आहे ती, शिवसेनाआणि राष्ट्रवादीतील अंतर्गत बंडाळीमुळे. अशातच महायुती आणि महाविकास आघाडीत सध्या जागावाटपाची धांदल सुरू आहे. अशातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अमित शहांचीदिल्लीत भेट झाल्याची माहिती समोर आल्याचं समोर येत आहे.**





या भेटीत लोकसभेच्या जागावाटपाबाबत चर्चा झाली असून शिंदे आणि शहांमध्ये डील पक्की झाल्याचं समजत आहे. राज्यात सध्या महायुतीचं सरकार आहे. महायुतीमध्ये शिवसेना , भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) असे तिन पक्ष सहभागी आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून महायुतीच्या जागावाटपाचा तिढा काही सुटण्याचं नाव घेत नव्हता. अशातच 'टाइम्स ऑफ इंडिया'नं दिलेल्या वृत्तानुसार, शिंदेंच्या दिल्ली भेटीनंतर शिवसेना आणि भाजप यांच्यातील जागावाटपाचा तिढा सुटल्याचं बोललं जात आहे. शिंदेंचा मान राखत भाजपनं शिवसेनेसाठी 13 जागा देण्यास सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. पण त्याबदल्यात भाजपनं शिंदेंकडे मुंबईतील सहा लोकसभेच्या जागांपैकी पाच लोकसभेच्या जागांची मागणी केली असून शिंदेंनी त्यासाठी होकार दिल्याचं सूत्रांनी सांगितलं आहे. सूत्रांनी दिलेल्या वृत्तानुसार, शिंदेंची शिवसेना राज्यात धनुष्यबाणावर लोकसभेच्या 13 जागा लढणार आहे. पण, त्याबदल्यात शिंदेंना मुंबई सोडावी लागली आहे. मुंबईतील सहापैकी पाच लोकसभेच्या जागांवर भाजप निवडणूक लढणार आहे. सध्याचं मुंबईतील समीकरण पाहता शिंदेंकडे मुंबईतील दोन खासदार आहेत. एक राहुल शेवाळे आणि दुसरे गजानन किर्तीकर. राहुल शेवाळेंचा मतदारसंघ शिवसेनेकडे देण्यात आला आहे. तर, एकनाथ शिंदेंनी गजानन कीर्तिकर यांच्या उत्तर-पश्चिम मुंबई लोकसभेच्या जागेच्या बदल्यात ठाण्याची जागा मागितल्याचं समजंत आहे. त्यामुळे विद्यमान खासदार राहुल शेवाळेंचं तिकीट कन्फर्म झालं असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. पण शिंदेंनी विद्यमान खासदार गजानन किर्तीकरांची जागा भाजपला सोडल्यामुळे आता गजानन किर्तीकर लोकसभा निवडणूक लढवणार की नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे. शिंदे गटातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महायुतीमध्ये एक करार झाला आहे, ज्यामध्ये भाजप 31 जागा लढवणार आहे, शिवसेना 13 आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला बारामती, शिरूर आणि रायगड व्यतिरिक्त परभणी अशा चार जागांची ऑफर देण्यात आली आहे. या भेटीत लोकसभेच्या जागावाटपाबाबत चर्चा झाली असून शिंदे आणि शहांमध्ये डील पक्की झाल्याचं समजत आहे. राज्यात सध्या महायुतीचं सरकार आहे. महायुतीमध्ये शिवसेना (शिंदे गट), भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) असे तिन पक्ष सहभागी आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून महायुतीच्या जागावाटपाचा तिढा काही सुटण्याचं नाव घेत नव्हता. अशातच 'टाइम्स ऑफ इंडिया'नं दिलेल्या वृत्तानुसार, शिंदेंच्या दिल्ली भेटीनंतर शिवसेना आणि भाजप यांच्यातील जागावाटपाचा तिढा सुटल्याचं बोललं जात आहे. शिंदेंचा मान राखत भाजपनं शिवसेनेसाठी 13 जागा देण्यास सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. पण त्याबदल्यात भाजपनं शिंदेंकडे मुंबईतील सहा लोकसभेच्या जागांपैकी पाच लोकसभेच्या जागांची मागणी केली असून शिंदेंनी त्यासाठी होकार दिल्याचं सूत्रांनी सांगितलं आहे.

### शिंदेंकडे मुंबईतील दोन खासदार

» सूत्रांनी दिलेल्या वृत्तानुसार, शिंदेंची शिवसेना राज्यात धनुष्यबाणावर लोकसभेच्या 13 जागा लढणार आहे. पण, त्याबदल्यात शिंदेंना मुंबई सोडावी लागली आहे. मुंबईतील सहापैकी पाच लोकसभेच्या जागांवर भाजप निवडणूक लढणार आहे. सध्याचं मुंबईतील समीकरण पाहता शिंदेंकडे मुंबईतील दोन खासदार आहेत. एक राहुल शेवाळे आणि दुसरे गजानन किर्तीकर. राहुल शेवाळेंचा मतदारसंघ शिवसेनेकडे देण्यात आला आहे. तर, एकनाथ शिंदेंनी गजानन कीर्तिकर यांच्या उत्तर-पश्चिम मुंबई लोकसभेच्या जागेच्या बदल्यात ठाण्याची जागा मागितल्याचं समजंत आहे. त्यामुळे विद्यमान खासदार राहुल शेवाळेंचं तिकीट कन्फर्म झालं असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. पण शिंदेंनी विद्यमान खासदार गजानन किर्तीकरांची जागा भाजपला सोडल्यामुळे आता गजानन किर्तीकर लोकसभा निवडणूक लढवणार की नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे. या भेटीत लोकसभेच्या जागावाटपाबाबत चर्चा झाली असून शिंदे आणि शहांमध्ये डील पक्की झाल्याचं समजत आहे. राज्यात सध्या महायुतीचं सरकार आहे. महायुतीमध्ये शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) असे तिन पक्ष सहभागी आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून महायुतीच्या जागावाटपाचा तिढा काही सुटण्याचं नाव घेत नव्हता.

# डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील ठाकरे गटात!

## गदा आणि मशाल मर्दाच्या हातात शोभतात : उद्धव बाळासाहेब ठाकरे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी आज शिवसेना ठाकरे गटात पक्षप्रवेश केला आहे. पक्षातून नामर्द पळून जात आहेत, पण मर्द पक्षात येत आहेत, असं म्हणत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी चंद्रहार पाटील यांचं पक्षात स्वागत केलं आहे.**



आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या अनेक राजकीय हालचाली पाहायला मिळत आहे. अनेक नेत्यांचे पक्षप्रवेश सुरु आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटानेही लोकसभेसाठी कंबर कसली आहे. आता चंद्रहार पाटील यांच्या ठाकरे गटात प्रवेशानंतर शिवसेना उबाठा गटाला सांगलीत खंदा उमेदवार मिळाला आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, खासदार संजय राऊत यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थिती मातोश्रीवर सोमवारी पक्षप्रवेश पार पडला. यावेळी चंद्रहार पाटील यांच्याकडून मोठे शक्ती प्रदर्शन करण्यात आलं. माझी छाती अभिमानाने फुलून आली आहे. या मर्दाची छाती बघितल्यानंतर सांगलीत आपल्या विरुद्ध लढण्याची कुणाची छाती होणार नाही. पक्षातून पळपुटे नामर्द पळून जात आहेत, पण मर्द पक्षात येत आहेत.शिवसेना ही मर्दांची संघटना आहे. मी लहान असताना मारुती माने साहेब घरी यायचे, बाळसाहेबांना भेटायचे ते दिवस आठवले आणि तीच परंपरा आजदेखील कायम आहे. आज डबल महाराष्ट्र केसरी पक्षात आले. 'अबकी बार चंद्रहार' पण फक्त घोषणा देऊन चालणार नाही, सर्वांना जबाबदारी घ्यावी लागेल. लोकांनी ठरवलंच आहे, त्याला मी काय संकेत देणार. जनतेनं एकदा संकेत दिल्यानंतर त्या पलिकडे काय संकेत द्यायचे. त्याच्यामुळे ही गदा आणि मशाल हे दोन्ही मर्दाच्या हातात शोभतात.

### क मर्द दिल्लीत पाठवायचा आहे

» हीच गदा आणि मशाल घेऊन आपल्याला एक मर्द दिल्लीत पाठवायचा आहे. लवकरच सांगलीत येणार. पूर्ण महाराष्ट्रातील गद्दारांना आडवं करायचं आहे. हुकूमशाही विरुद्ध लढताना तुमच्यासारखे तरणेबाण मर्द पहिलवान शिवसेनेत आले आहेत आणि भविष्य तुमच्या हातात आहे. जनता आपल्याकडे अपेक्षेनं बघते आहे, असंही उद्धव ठाकरे यांनी यावेळी म्हटलं आहे.

# हरियाणामध्ये राजकीय भूकंप


## मनोहरलाल खट्टर यांचा राजीनामा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुका जाहीर होण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक असताना हरियाणामध्ये राजकीय भूकंप झाला आहे. हरियाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे हरियाणातील सत्ताधारी भाजपा व जेजेपी यांच्यातील सुंदोपसुंदी चव्हाट्यावर आल्याचं बोललं जात आहे. ऐन लोकसभा निवडणुकांच्या धामधुमीत थेट मुख्यमंत्र्यांनीच राजीनामा दिल्यामुळे राजकीय तर्क-वितर्कांना उधाण आलं आहे. या राजीनाम्यासाठी दोन्ही सत्ताधारी पक्षांमधील लोकसभा निवडणूक जागावाटप कारणीभूत ठरल्याचं बोललं जात आहे.**

मनोहर लाल खट्टर व त्यांच्या मंत्र्यांनी आज सकाळी त्यांच्या पदाचा राजीनामा सादर केला. विशेष म्हणजे हरियाणा मंत्रीमंडळाचा विस्तार बऱ्याच दिवसांपासून चर्चेचा विषय ठरला होता. भारतीय जनता पक्ष व जननायक जनता पार्टी या दोन्ही सत्ताधारी पक्षांमध्ये आधी मंत्रीमंडळ विस्तार व नंतर लोकसभेसाठीचं जागावाटप यावरून टोकाचा विसंवाद झाल्याचं सांगितलं जात आहे. यासंदर्भात इंडियन एक्स्प्रेसनं सविस्तर वृत्त दिलं आहे.दरम्यान, हरियाणातील आगामी मंत्रीमंडळ विस्तारामध्ये मोठे फेरबदल होणार, अशी चर्चा आहे. यामध्ये जेजेपी पक्षाच्या एकाही आमदाराला मंत्रीपद देण्यात आलेलं नसून भाजपा अपक्ष आमदारांचा सरकारसाठी पाठिंबा घेऊ शकते. त्यासाठी काही अपक्षांना मंत्रीपदही दिलं जाण्याची शक्यता आहे.दरम्यान, भाजपा व जेजेपी या दोन्ही सत्ताधारी पक्षांमध्ये आगामी लोकसभा निवडणुकासाठीच्या जागावाटपाबाबत तिढा निर्माण झाला होता. यासंदर्भात जेजेपी नेते व उपमुख्यमंत्री दुष्यंत चौटाला यांनी भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची सोमवारी दिल्लीत भेट घेतली असता त्यावेळी त्यांना हरियाणामध्ये एकही जागा दिली जाणार नसल्याचं सांगण्याच आल्याची माहिती समोर आली आहे. एकीकडे जेजेपीची दोन जागांची मागणी असताना भाजपानं मात्र सर्व १० जागा लढवण्याची तयारी केली आहे. जेजेपीला हरियाणातील हिसार व भिवानी-महेंद्रगड लोकसभा मतदारसंघ हवे होते. मात्र, भाजपानं सर्व जागा लढवणार असल्याचं पक्षातील वरीष्ठांना कळवलं आहे. तसेच, संभाव्य उमेदवारांची यादीही भाजपाकडून तयार करण्यात आल्याचं सांगितलं जात आहे.हरियाणा विधानसभेच्या २०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकांनंतर भाजपा व जेजेपीनं आघाडी करण्याचा निर्णय जाहीर केला होता.



### जागावाटप यावरून विसंवाद

मनोहर लाल खट्टर व त्यांच्या मंत्र्यांनी आज सकाळी त्यांच्या पदाचा राजीनामा सादर केला. विशेष म्हणजे हरियाणा मंत्रीमंडळाचा विस्तार बऱ्याच दिवसांपासून चर्चेचा विषय ठरला होता. भारतीय जनता पक्ष व जननायक जनता पार्टी या दोन्ही सत्ताधारी पक्षांमध्ये आधी मंत्रीमंडळ विस्तार व नंतर लोकसभेसाठीचं जागावाटप यावरून टोकाचा विसंवाद झाल्याचं सांगितलं जात आहे. यासंदर्भात इंडियन एक्स्प्रेसनं सविस्तर वृत्त दिलं आहे.दरम्यान, हरियाणातील आगामी मंत्रीमंडळ विस्तारामध्ये मोठे फेरबदल होणार, अशी चर्चा आहे. या निवडणुकीत भाजपाला बहुमताचा आकडा पार करण्यात अपयश आल्यामुळे जेजेपीशी आघाडी करून हरियाणात भाजपाप्रणीत सरकार अस्तित्वात आलं. हरियाणा विधानसभेत भाजपाकडे ४१, जेजेपीकडे १०, काँग्रेसकडे ३०, अपक्ष ७, इंडियन नॅशनल लोक दल व हरियाणा लोकहित पार्टी यांच्याकडे प्रत्येकी एक आमदार असं पक्षीय बलाबल आहे.लोकसभा निवडणुका जाहीर होण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक असताना हरियाणामध्ये राजकीय भूकंप झाला आहे.

# काँग्रेसची पुढील यादी एकदोन दिवसांत?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

भाजपप्रमाणे काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक सोमवारी झाली असून गुजरात, राजस्थान, उत्तराखंड, आसाम, मध्य प्रदेश या राज्यांतील संभाव्य उमेदवार निश्चित करण्यात आले असल्याचे समजते. पुढील एखाद-दोन दिवसांमध्ये काँग्रेसची दुसरी याही जाहीर होण्याची शक्यता आहे. या बैठकीमध्ये उत्तरप्रदेशची चर्चा झाली नसल्याने अमेठीमधून राहुल गांधी व रायबरेलीतून प्रियंका गांधी-वाड्रा निवडणूक लढवणार की नाही, याबाबत संदिग्धता अजूनही कायम आहे. काँग्रेसच्या पहिल्या यादीमध्ये केरळमधील वायनाड मतदारसंघातून राहुल गांधी यांची उमेदवारी घोषित करण्यात आली आहे.

गेल्या आठवड्यात काँग्रेसने केरळ, तेलंगणा, छत्तीसगढ व ईशान्येकडील राज्यांतील ३९ उमेदवार जाहीर केले होते. केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीत राजस्थानमधील १३ जागांवरील उमेदवारांसंदर्भात चर्चा झाली असून ९-१० जागांवर सहमती झाल्याचे समजते. मध्य प्रदेशमधील ७० टक्के जागांवरील उमेदवार निश्चित करण्यात आल्याचे प्रदेशाध्यक्ष जितू पटवारी यांनी सांगितले.समितीच्या दुसऱ्या बैठकीलाही राहुल गांधी गैरहजर होते. राहुल गांधी भारत जोडो न्याय यात्रेमध्ये व्यग्र असले तरी, समितीच्या बैठकीसाठी सोमवारी ते दिल्लीला येणार असल्याचे सांगितले जात होते. मुख्यालयात झालेल्या बैठकीला पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, सोनिय गांधी, के. सी वेणुगोपाल यांच्यासह अन्य नेते उपस्थित होते.महाविकास आघाडीतील शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) या तीनही घटक पक्षांमध्ये जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यामध्ये आली आहे. मात्र बहुजन वंचित आघाडीच्या समावेशाबाबत संदिग्धता कायम आहे. महाविकास आघाडीमध्ये जागावाटपावर शिक्कामोर्तब झाल्याशिवाय केंद्रीय स्तरावर काँग्रेसचे उमेदवार निश्चित करता येत नसल्यामुळे महाराष्ट्राची चर्चा लांबणीवर पडली आहे.समितीची बैठक सोमवारी झाली असून गुजरात, राजस्थान, उत्तराखंड, आसाम, मध्य प्रदेश या राज्यांतील संभाव्य उमेदवार निश्चित करण्यात आले असल्याचे समजते. पुढील एखाद-दोन दिवसांमध्ये काँग्रेसची दुसरी याही जाहीर होण्याची शक्यता आहे. या बैठकीमध्ये उत्तरप्रदेशची चर्चा झाली नसल्याने अमेठीमधून राहुल गांधी व रायबरेलीतून प्रियंका गांधी-वाड्रा निवडणूक लढवणार की नाही, याबाबत संदिग्धता अजूनही कायम आहे.

# लग्न समारंभात गोळीबार करणे दुर्दैवी : सर्वोच्च न्यायालय

## उत्साहात होणाऱ्या गोळीबारावर सर्वोच्च न्यायालयाची नाराजी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि. ११ मार्च) एका सुनावणीदरम्यान महत्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. देशात लग्न समारंभात अनेकदा आनंदोत्सवात गोळीबार केल्याचे प्रकार घडतात. ही दुर्दैवी बाब आहे. लग्नसमारंभातील या प्रथेला सर्वोच्च न्यायालयाने दुर्दैवी ठरवत याचे घातक परिणाम होत असल्याची महत्वपूर्ण टिप्पणी केली आहे.**

उत्तर प्रदेशातील फिरोजाबाद येथील व्यक्तीवर २०१६ मध्ये एका लग्न समारंभात गोळीबार केल्याप्रकरणी खूनाचा गुन्हा दाखल झाला होता. या गोळीबारात एका व्यक्तीचा मृत्यू झाला. या प्रकरणात जिल्हा न्यायालयाने आणि अलाहाबाद उच्च न्यायालयाने आरोपी शाहिद अलीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. यानंतर अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. मागील काही वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी सुरू होती.

अखेर सोमवारी (दि. ११ मार्च) या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय देत काही महत्वाचे निरीक्षण नोंदवले. आरोपी शाहिद अलीची अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेली जन्मठेपेची शिक्षा रद्द ठरवली. आरोपी शाहिद अलीने आठ वर्ष तुरुंगवास भोगला आहे. सर्वोच्च न्यायालयाने आता आरोपीची शिक्षा रद्द केली आहे.

या प्रकरणाचा निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवत देशात लग्न समारंभात अनेकदा आनंदोत्सवात गोळीबार केल्याचे प्रकार घडतात. ही दुर्दैवी पण प्रचलित प्रथा आहे. मात्र, या दुर्दैवी प्रकाराचे घातक परिणाम होतात. हे प्रकरणदेखील याचे उदाहरण आहे, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने नोंदवले.



### कित्येक लोक मृत्यूमुखी पडले

खासकरून उत्तर भारतात लग्न समारंभात गोळीबार केल्याची अनेक उदाहरणे पाहायला मिळतात. प्रथेच्या नावाखाली असा गोळीबार केला जात असल्याचे सांगितले जात असले तरी त्यामुळे अनेकदा दुर्घटना झालेल्या आहेत. कित्येक ठिकाणी लोक मृत्यूमुखी पडलेले आहेत. भारतीय सिनेसृष्टीनेही या प्रकारांना चित्रपट आणि मालिकांमधून दाखविले आहे. सर्वोच्च न्यायालयाने फिरोजाबाद प्रकरणात आरोपीला शिक्षेत काही प्रमाणात दिलासा दिला असला तरी अशा प्रथा अवैध आहेत, यावरही महत्वाचे भाष्य केले.सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि. ११ मार्च) एका सुनावणीदरम्यान महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले.

# नितीश भारद्वाज यांच्या जुळ्या मुलींची मागितली होती माफी



बीआर चोप्रा यांच्या 'महाभारत' या टीव्ही मालिकेत श्रीकृष्णाची भूमिका साकारून लोकप्रिय झालेले नितीश भारद्वाज गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहेत. त्यांची आयएएस पत्नी स्मिता घाटे मुलींना भेटू देत नसल्याचं त्यांनी म्हटलं होतं. दोघेही वेगळे राहत असून त्यांच्या घटस्फोटाची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, नितीश यांचा व त्यांच्या मुलींचा दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूतशी खूप चांगला बाँड होता, असं त्यांनीच एकदा सांगितलं होतं. सुशांत सिंह राजपूत आणि नितीश भारद्वाज यांनी 'केदारनाथ' चित्रपटात एकत्र काम केलं होतं. नितीश यांनी या चित्रपटात सारा अली खानच्या वडिलांची भूमिका साकारली होती. त्यावेळी नितीश यांचे त्यांच्या जुळ्या मुली देवयानी आणि शिवरंजनी यांच्याशी चांगले संबंध होते. ते आपल्या मुलींना चित्रपटाच्या शूटिंगला घेऊन जात असे. त्यांच्या मुलीही सुशांतला भेटायच्या आणि तो त्यांचे खूप लाड करायचा.एकदा सुशांतने आपल्या मुलींना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्याचं वचन दिलं होतं, पण तो शुभेच्छा द्यायला विसरला. यानंतर सुशांतने देवयानी आणि शिवरंजनी यांची माफी मागितली होती. सुशांत नितीश यांच्या मुलींचा चांगला मित्र होता. २०२० मध्ये सुशांतचा मृत्यू झाला तेव्हा या बातमीमुळे मोठा धक्का बसला, असं नितीश यांनी म्हटलं होतं. नितीश भारद्वाज त्यांच्या आयएएस पत्नी स्मिता यांच्या विरोधात कायदेशीर लढाई लढत आहेत. आपण खूप दिवसांपासून आपल्या मुलींना पाहिलेलं नाही. आपल्या मुली कुठे आहेत किंवा कोणत्या शाळेत शिकत आहेत हेही माहीत नाही, असं त्यांनी म्हटलं होतं. तर यावर उत्तर देताना त्यांच्या पत्नी म्हणाल्या होत्या की नितीश स्वतःच भेटण्यास नकार देतात.

# कतरिनाचा पोलका डॉट ड्रेसमधील व्हिडीओ व्हायरल



कतरिना कैफ आणि विकी कौशल बॉलीवूडचं लोकप्रिय कपल आहे. काही वर्षे डेट केल्यानंतर दोघांनी ९ डिसेंबर २०२१ रोजी लग्नगाठ बांधली. या दोन वर्षांत अनेकदा कतरिना गरोदर असल्याची चर्चा रंगली होती. अलीकडेच जामनगरवरून परततानासुद्धा कतरिना प्रेग्नेंट असल्याची शक्यता वर्तवली जात होती, पण या कपलकडून तसा काही खुलासा आजतागायत झालेला नाही. आता लग्नाच्या इतक्या वर्षांनी चाहते या गुड न्यूजची वाट पाहतायत. अशातच चाहत्यांसाठी कदाचित ही गुड न्यूज खरी ठरण्याची शक्यता आहे. नुकतीच कतरिना कैफ मुंबई विमानतळावर दिसली होती. विशेष म्हणजे कतरिनाच्या 'एअरपोर्ट लूक'मुळे चाहत्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. या 'एअरपोर्ट लूक'साठी कतरिनाने सफेद रंगाचा पोलका डॉट ड्रेस परिधान केला होता. यावर तिने ओव्हरसाईज्ड काळ्या रंगाचं लेदर जॅकेट घातलं होतं. ग्लासेस, बन आणि मॅचिंग बूट्समध्ये कतरिना सुंदर तर दिसतच होती, पण चाहत्यांनी या ड्रेसचा संबंध तिच्या प्रेग्नेंसीशी जोडला आहे.आजपर्यंतचा बॉलीवूडमधील इतिहास पाहायला गेलो तर ज्या अभिनेत्री पोलका डॉट ड्रेसवर पाहायला मिळाल्या आहेत, त्यांनी लगेचच गुड न्यूज दिली आहे. अनुष्का शर्मा, करिना कपूर, आलिया भट्ट, प्रियांका चोप्रा, नताशा स्टँकोविक या अभिनेत्री गुड न्यूज देण्याआधी अशा पोलका डॉट ड्रेसवर पाहायला मिळाल्या होत्या.कतरिनाचा विमानतळावरील हा व्हिडीओ सोशल मीडियावर सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होताना दिसत आहे. यावर चाहत्यांनी तर्कवितर्क लावून आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. काही जण "पोलका डॉट ड्रेस म्हणजे गुड न्यूज आहे का?" अशाप्रकारच्या कमेंट्स करत आहेत. तर काही जण म्हणतायत, "४० वर्षांची असताना ती गुड न्यूज कशी काय देऊ शकते?, सरोगसी हा पर्याय असू शकतो."अनंत अंबानी आणि राधिका मर्चंटच्या प्री-वेडिंग सोहळ्यातून परतताना कतरिनाच्या प्रेग्नेंसीची चर्चा सुरू झाली होती. त्यावेळी कतरिनाने फिकट गुलाबी रंगाची अनारकली परिधान केली होती आणि यावर ओढणी घेत तिने पोटापर्यंत शरीर झाकलं होतं. यामुळे बाकीच्या अभिनेत्रींसारखचं कतरिनासुद्धा गरोदर आहे का? अशी चर्चा सुरू झाली होती.

# आम्ही सलमानसारखे यशस्वी

गेल्या काही वर्षांपासून बॉलिवूडमध्ये 'नेपोटिझम'बद्दल होणारी बरीच चर्चा आपल्या कानावर आली आहे. काहींनी याच्या समर्थनात तर काही सेलिब्रिटीजनी याच्या विरोधात त्यांची मतं मांडली आहेत. नुकतंच अरबाज खान आणि सोहेल खान यांदेखील यावर आपलं मत मांडलं आहे. एखाद्या अभिनेत्याच्या यशाचे श्रेय त्याच्या कुटुंबाला देणे चुकीचे असल्याचे त्यांनी एका मुलाखतीमध्ये स्पष्ट केले. सलीम खान यांचा मुलगा आणि सलमान खानचा भाऊ असल्याने आजही त्या दोघांना म्हणावे तसे यश मिळाले नसले तरी ते आज वेगळ्या क्षेत्रात नाव कमवत आहेत. अरबाज खानने 'टाइम्स नाऊ'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, "जर तुमचे वडील केवळ फिल्म इंडस्ट्रीतीलच नाही तर एखाद्या वेगळ्या क्षेत्रातले असतील तर तुमच्यासाठी ते फायद्याचेच असते. तुम्हाला तिथे काम करण्याची संधी मिळू शकते. तुमचे वडील डॉक्टर असतील, वकील असतील तर ते तुम्हाला त्या व्यवसायांमध्ये पुढे जाण्यास मदत करू शकतात. त्याचप्रमाणे एक अभिनेता म्हणून आम्हाला हे आमच्या वडिलांमुळे शक्य झालं. आम्हाला ज्या व्यक्तिबरोबर काम करायचे होते त्यांना भेटायची संधी तर लगेच मिळायची पण ती व्यक्ती आपल्याला काम देईलच याची शाश्वती नसे."पुढे अरबाज म्हणाला, "जर तुमचे आई-वडील या क्षेत्रात असतील तर तुम्हाला ब्रेक लगेच मिळू शकतो किंवा त्यासाठी फार काही कष्ट घ्यावे

# जब तक तुम्हारा बाप जिंदा है!

'पठाण', 'जवान' व 'डंकी' अशा लागोपाठ तीन ब्लॉकबस्टर चित्रपटांच्या आधारे २०२३ हे वर्ष शाहरुख खानने गाजवलं. गेल्यावर्षी जानेवारी महिन्यांत तब्बल चार वर्षांच्या ब्रेकनंतर किंग खानने रुपेरी पडद्यावर पुनरागमन केलं होतं. त्याच्या तिन्ही चित्रपटांनी गेल्यावर्षी बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी केल्यामुळे सध्या सगळ्या पुरस्कार सोहळ्यांमध्ये शाहरुख खानचं वर्चस्व पाहायला मिळत आहेत.शाहरुख खानने बहुमानाचा 'दादासाहेब फाळके आंतरराष्ट्रीय चित्रपट पुरस्कार' प्राप्त केल्यानंतर आता 'झी सिने अवॉर्ड्स'मध्ये त्याने सर्वोत्कृष्ट अभिनेत्याच्या पुरस्कारावर नाव कोरलं आहे. पुरस्कार जिंकल्यावर शाहरुखने त्याच्या कुटुंबीयांना रंगमंचावरून एक खास मेसेज दिला आहे. सध्या किंग खानचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

# आलियाने ऐश्वर्या , दीपिका प्रियांका चोप्राचं केले कौतुक




अभिनेत्री आलिया भट्टने बॉलीवूडबरोबरच हॉलीवूड चित्रपट करीत जगभरात आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. आलिया आता फक्त अभिनेत्रीच नव्हे, तर निर्माती व उद्योजकदेखील आहे. करिअरच्या उच्चांकावर असतानाही आलियाने हिंदी सिनेसृष्टीतील ऐश्वर्या राय, दीपिका पदुकोण व प्रियांका चोप्रा या अभिनेत्री तिची प्रेरणा असल्याचे सांगितले. 'फोर्ब्स ३०/५०'ला दिलेल्या मुलाखतीत आलिया म्हणाली, "या तिघींचं मी मनापासून कौतुक करते. चित्रपटाचं कथानक आणि आपला अभिनय यांच्या जोरावर पात्र रंगलं पाहिजे आणि भारतीय चित्रपटसृष्टीतील या अभिनेत्रींनी हे करून दाखवलंय. या अभिनेत्रींमुळे मला नेहमी प्रेरणा मिळते. ऐश्वर्या राय, दीपिका पदुकोण व प्रियांका चोप्रा या अभिनेत्री तर आहेतच; पण त्या माझ्या चांगल्या मैत्रिणीही आहेत आणि मला त्यांचं खूप कौतुक वाटतं. त्यांनी अभिनय क्षेत्रातील अनेक गोष्टी आधीच सामान्य करून ठेवल्यामुळे याचं श्रेय मला त्यांना द्यावंसं वाटतं." "आपण अशा काळात जगत आहोत; जिथे विविधता ही काळाची गरज आहे. जिथे तुम्हाला जगाच्या वेगवेगळ्या भागांतील वेगवेगळे चेहरे पाहायचे आहेत. वेगवेगळ्या भाषांमध्ये बोलायचं आहे. पण, शेवटी तुमची गोष्ट सगळ्यांपर्यंत पोहोचणं हे जास्त महत्त्वाचं. मग तुम्ही कुठून आलात, कोणत्या भाषेत बोलता या गोष्टींमुळे फरक पडत नाही." असंही आलियानं नमूद केलं.गेल्या वर्षी 'कॉफी विथ करण'च्या एपिसोडमध्ये जेव्हा आलियाला विचारण्यात आलं होतं, "दीपिका पदुकोण तिची स्पर्धक आहे, असं तिला वाटतं का?" त्यावर आलिया म्हणाली होती, "अजिबात नाही.

# रणजी विजयाकडे मुंबईची वाटचाल!

## रणजी ट्रॉफी अंतिम फेरीत मुंबईसमोर विदर्भाचे आव्हान

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**रणजी ट्रॉफी २०२३-२४ हंगामातील विजेतेपदाचा सामना १० मार्चपासून मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळला जात आहे. या सामन्यात मुंबई आणि विदर्भ आमनेसामने आहेत. महाराजा रणजित सिंग यांच्या नावाने खेळल्या जाणाऱ्या ट्रॉफीचा पहिला हंगाम १९३४-३५ मध्ये झाला. तेव्हापासून मुंबईने ४१ वेळा विजेतेपद पटकावले आहे. त्याचबरोबर विदर्भ संघाने आतापर्यंत जेतेपदावर दोनदा नाव कोरलं आहे. सध्या सुरु असलेल्या सामन्यात मुंबई संघाची मजबूत पकड पाहायला मिळत आहे.**



या शतकातच मुंबईने सात जेतेपदे जिंकली आहेत आणि केवळ ६ वेळा विजेतेपदाचा सामना गमावला आहे. सध्याचा संघ आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंनी भरलेला आहे. कर्णधार अजिंक्य रहाणे, श्रेयस अय्यर, पृथ्वी शॉ, शार्दुल ठाकूर यांच्यासह अनेक मोठी नावे आहेत, तर दुसरीकडे या स्पर्धेत विदर्भाने विरोधी संघांवर वर्चस्व गाजवत इथपर्यंत मजल मारली आहे. मात्र मागील आठ वर्षांपासून मुंबईला जेतेपदाचा दुष्काळ संपवत आला नाही. मुंबईने २०१६ मध्ये शेवटची ट्रॉफी जिंकली होती. मुंबईचा संघ आतापर्यंत केवळ ६ वेळा फायनलमध्ये पराभूत झाला आहे. १९४८-४९ च्या मोसमात प्रथमच, मुंबई अंतिम फेरीत पोहोचल्यानंतर विजय मिळवू शकली नाही. २०२१-२२ च्या मोसमात मुंबई अंतिम फेरीत गेल्यावर पराभूत झाली होती. तेव्हा मुंबईला मध्य प्रदेशकडून पराभव स्वीकारावा लागला.रणजी करंडक स्पर्धेच्या जेतेपदासाठी मुंबई सहा मोसमांपासून प्रतीक्षा करत आहे. गेल्या वेळी २०१५-१६ मध्ये सौराष्ट्रला पराभूत करून संघ चॅम्पियन बनला होता. अंतिम फेरीत प्लेइंग इलेव्हनमध्ये सहभागी झालेले केवळ तीनच खेळाडू अद्याप संघात आहेत. त्यानंतर श्रेयस अय्यरने ११७ धावांची खेळी केली होती. शार्दुल ठाकूरने पहिल्या डावात ३ तर दुसऱ्या डावात ५ बळी घेतले. त्यावेळी धवल कुलकर्णीही संघात होता. त्यानंतर मुंबईने दोन फायनल गमावल्या आहेत. आत्तापर्यंत असे कधीच घडले नाही की मुंबईने सलग दोनदा फायनल गमावली आहे.रणजी ट्रॉफीमध्ये मुंबईच्या यशाचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्यांची फलंदाजी. मुंबईने भारतीय क्रिकेटला अनेक मोठे फलंदाज दिले आहेत. पॉली उमरीगर, अजित वाडेकर, विजय मर्चंट, सुनील गावसकर, रवी शास्त्री, सचिन तेंडुलकर, दिलीप वेंगसरकर, रोहित शर्मा आणि अजिंक्य रहाणे हे मुंबईचे आहेत.

### मुंबईने 41 वेळा विजेतेपद पटकावले

» या सामन्यात रहाणे दुखापतीमुळे खेळू शकला नव्हता. त्यामुळे या सामन्यांमध्ये मुंबईचे नेतृत्व शिवम दुबेने केले होते.सामन्याबद्दल बोलायचे, तर विदर्भाचा कर्णधार अक्षय वाडकरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना मुंबईने पहिल्या डावात २२४ धावा केल्या. प्रत्युत्तरात विदर्भाचा पहिला डाव १०५ धावांत आटोपला. मुंबईने दुस-या डावात तीन गड्यांच्या मोबदल्यात २६२ धावा केल्या आहेत. सध्या मुशीर खान आणि श्रेयस अय्यर क्रीजवर आहेत. पृथ्वी शॉ ११ धावा करून, भूपेन लालवानी १८ धावा करून आणि अजिंक्य रहाणे ७३ धावा करून बाद झाले. रणजी ट्रॉफी २०२३-२४ हंगामातील विजेतेपदाचा सामना १० मार्चपासून मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळला जात आहे. या सामन्यात मुंबई आणि विदर्भ आमनेसामने आहेत. महाराजा रणजित सिंग यांच्या नावाने खेळल्या जाणाऱ्या ट्रॉफीचा पहिला हंगाम १९३४-३५ मध्ये झाला. तेव्हापासून मुंबईने ४१ वेळा विजेतेपद पटकावले आहे. त्याचबरोबर विदर्भ संघाने आतापर्यंत जेतेपदावर दोनदा नाव कोरलं आहे. सध्या सुरु असलेल्या सामन्यात मुंबई संघाची मजबूत पकड पाहायला मिळत आहे.

या रणजी मालिकेत रहाणे मुंबईचे कर्णधारही आहे. पृथ्वी शॉ, शार्दुल ठाकूर, श्रेयस अय्यर यांसारखी मुंबईचे खेळाडू भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत आहेत.यंदाचा हंगाम मुंबईसाठी भयानक गेला आहे. कारण या हंगामात अजिंक्य रहाणे, श्रेयस अय्यर आणि पृथ्वी शॉसारखे खेळाडू खास कामगिरी करु शकले नाही. त्यामुळे संघाला प्रत्येक वेळी विजयासाठी संघर्ष करावा लागला आहे. प्रत्येक सामन्याला कोणीतरी संघासाठी उभं राहिलं आहे. मुंबईचा पहिला सामना बिहारमध्ये होता. हे स्टेडियम खंडर स्थितीत होतं आणि मुंबईच्या टीमला पाहायला प्रचंड गर्दी झाली होती.

# गुजरातला हार्दिकची उणीव भासणार नाही!

## संघ चांगल्या स्थितीत असल्याचे अनुभवी गोलंदाज हॉगने म्हटले

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएलच्या १७व्या हंगामाला सुरुवात होण्यास १० दिवसांपेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे. हार्दिक पंड्या या स्पर्धेच्या सतराव्या हंगामात मुंबई इंडियन्सचे नेतृत्व करताना दिसणार आहे. रोहित शर्माच्या जागी त्याच्याकडे संघाची कमान सोपवण्यात आली आहे. स्टार अष्टपैलू खेळाडूच्या नेतृत्वाखाली गुजरातने आयपीएल २०२२ चे विजेतेपद पटकावले. दरम्यान, ऑस्ट्रेलियाच्या माजी फिरकीपटूने गुजरातच्या माजी कर्णधाराबद्दल मोठे वक्तव्य केले आहे.**



ब्रॅड हॉगने हार्दिक पंड्या सोडून गेल्यामुळे गुजरातला काही फरक पडेल की नाही? यावर आपले मत मांडले आहे.गुजरात टायटन्सला हार्दिक पंड्याची उणीव भासू शकते, असे मानले जात आहे. मात्र, स्टार अष्टपैलू खेळाडू नसतानाही संघ चांगल्या स्थितीत असल्याचे अनुभवी गोलंदाज ब्रॅड हॉगने म्हटले आहे. हार्दिकचे संघात नसणे हे फार मोठे नुकसान नाही, असे माजी क्रिकेटपटूचे मत आहे.

माजी ऑस्ट्रेलियन फिरकीपटू ब्रॅड हॉग म्हणाला, “मला वाटत नाही की हार्दिक पंड्याने साथ सोडल्यामुळे गुजरातची खरोखरच इतके मोठे नुकसान झाले आहे. होय, तो मधल्या फळीतील एक दर्जेदार अष्टपैलू खेळाडू आहे, परंतु ते कव्हर करू शकतात. त्यांच्याकडे खरोखर चांगले गोलंदाज आहेत. तो क्रमवारीत वरच्या स्थानावर फलंदाजीसाठी करायचा, परंतु मला वाटत नाही की तो तिथे फिट होता, त्यामुळे त्याच्याशिवाय संघ अधिक चांगला आहे.”ब्रॅड हॉगने मुंबईला हार्दिकला खालच्या क्रमांकावर फलंदाजी करण्यास पाठवण्याचा सल्ला दिला. तो पुढे म्हणाला, “मुंबईसाठी भारतीय अष्टपैलू खेळाडूला खालच्या क्रमावर फलंदाजी करायला लावणे चांगले आहे आणि मला वाटते की हार्दिक येथे फलंदाजी करेल.

### पंड्याची उणीव भासू शकते

» मला वाटते की आपण मुंबई इंडियन्ससोबत हार्दिकला त्याची सर्वोत्तम कामगिरीत करताना पाहू.”भारतासाठी, हार्दिकने त्याच्या कारकिर्दीत आतापर्यंत ९२ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १३४८ धावा आणि ७३ बळी घेतले आहेत. २०१५ मध्ये त्याने मुंबईसाठी पदार्पण केले होते. त्याने ९२ आयपीएल सामन्यांमध्ये पंड्याने १४७६ धावा केल्या आहेत आणि ४२ विकेट्स घेतल्या आहेत.आयपीएलच्या १७व्या हंगामाला सुरुवात होण्यास १० दिवसांपेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे. हार्दिक पंड्या या स्पर्धेच्या सतराव्या हंगामात मुंबई इंडियन्सचे नेतृत्व करताना दिसणार आहे. गुजरातने आयपीएल २०२२ चे विजेतेपद पटकावले. दरम्यान, ऑस्ट्रेलियाच्या माजी फिरकीपटूने गुजरातच्या माजी कर्णधाराबद्दल मोठे वक्तव्य केले आहे.